ePaper

देशात 55 टक्के लोक हिंदी भाषिक, भाषेला कमी लेखणं बरोबर नाही : शरद पवार

वर्ष - 8 । अंक - 316 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™



## आतील पानांत


- ऋषभ काही झेल पकडू शकला नाही
- गोल्डन बॉयने पटकावलं सुवर्णपदक!
- इराण-इस्रायल अखेर शस्त्रसंधी
- हजारो विमान प्रवाशांना फटका



www.mahaenews.com । बुधवार, दि. 25 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### अजितदादांकडे 14 - 14 हजार कोटींचे दोन निधी, सापत्नपणाची वागणूक मिळाल्याचा आरोप : एकनाथ शिंदेंचे सेना आमदारांना आदेश!

# अजितदादांच्या खात्यावर 'वॉच'!

## निधी वाटप आणि निधी वितरणावरून शिवसेनेचे आमदार खवळले, थेट अजितदादांवर आरोप !

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील 'महायुती' सरकारमधील दोन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यामध्ये वादाची ठिणगी पडली की काय, असे राजकीय चित्र उभे राहिले आहे. अजितदादांच्या अर्थ खात्यावर 'वॉच' ठेवण्याचे आदेश शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांना दिले असल्याने आता रान चांगलेच पेटणार आहे.**

### अजितदादा बारामतीत तळ ठोकून...

दरम्यान, बारामती येथे माळेगाव सहकारी साखर कारखान्याची निवडणूक आणि तेथील मतमोजणी असल्यामुळे गेले काही दिवस अजित पवार हे बारामती तळ ठोकून आहेत. त्यांनी सायंकाळी पत्रकारांशी संवाद साधून आपली बाजू मांडली. जे काही वाद दिसत आहेत त्याबाबत आपण एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करू असे अजित दादा म्हणाले.

### निधी नसल्याचा नेहमीचा आरोप!

मंत्रिमंडळाच्या बैठकीत फडणवीस आणि शिंदे यांच्याकडे शिवसेनेच्या मंत्र्यांनी निधी वाटपाचा मुद्दा उपस्थित केला. अजित पवार निधी देत नाहीत, असा नाराजीचा सूर लावलेल्या शिवसेनेच्या मंत्र्यांना एकनाथ शिंदे यांनी आता थेट आदेश दिले आहेत. अजित पवारांच्या खात्याकडे मोठा निधी आहे, त्यावर लक्ष ठेवा. तो निधी कुठे वितरित होतो, याची माहिती घ्या आणि मग आकडेवारीनिशी आपण बोलू या, असा आदेश एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मंत्र्यांना दिल्याची माहिती आहे. कॅबिनेटच्या बैठकीनंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांची वेगळी बैठक घेतली. त्यामध्ये निधी वाटपावरुन शिंदेंच्या मंत्र्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याचे वृत्त आहे.

### निधीवरून तिघांमध्ये धुसफूस...

'महायुती' सरकारच्या तीन घटक पक्षांमध्ये निधी वाटपासंबंधी सातत्याने धुसफूस सुरू असल्याचे दिसून येत आहे. त्यातही शिंदेंच्या शिवसेनेच्या मंत्र्यांनी अर्थमंत्री अजित पवार यांच्याविषयी अनेकदा नाराजी व्यक्त केली आहे. त्याच पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मंत्र्यांची स्वतंत्र बैठक घेतली. राज्यामध्ये 'महाविकास आघाडी'चे सरकार असताना अजित पवार हेच अर्थमंत्री होते आणि ते निधी वाटपामध्ये अन्याय करत असल्यामुळे त्यावेळी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे आमदार फुटले होते. पण, पुन्हा अजित पवार हे 'महायुती' यामध्ये आल्यामुळे तीच परिस्थिती उद्भवली आहे.

### निधी वाटपावरुन वाद नाही..

या संदर्भात अजित पवार यांनी सायंकाळी उशिरा पत्रकारांशी बोलताना सांगितले की 'महायुती' मध्ये निधी वाटपावरून कसलाही वाद नाही किंवा मानापमान नाट्यही नाही. अर्थमंत्रीपद सांभाळताना काही व्यवधाने सांभाळावी लागतात. त्यातून मग निधीची फिरवाफिरव होते. त्यात गैरव्यवहार झाला, सापत्न पणाची वागणूक मिळाली, असा आरोप करणं चुकीचं आहे. मी मुख्यमंत्री किंवा शिंदेसाहेब यांच्याशी याबाबत सविस्तर बोलणार आहे, असेही ते म्हणाले.

### एकनाथ शिंदे निधीवरुन आक्रमक

राज्यातील निधी वाटपावरुन एकनाथ शिंदे आक्रमक झाल्याचे दिसून आले. अजित पवारांच्या खात्यावर बारकाईने लक्ष ठेवा, असा आदेश त्यांनी मंत्र्यांना दिला आहे. अजित पवारांच्या खात्यात १४- १४ हजार कोटींचे दोन निधी आहेत. त्यावर लक्ष ठेवले पाहिजे. हा निधी कुठे वितरीत होत आहे, यांची माहिती आपल्याला मिळाली पाहिजे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

### हक्काचे मिळालेच पाहिजे..

जे आपल्या हक्काचे आहे, ते घेतलेच पाहिजे, असा आदेश एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांना दिला आहे. त्यामुळे आता अजित पवारांच्या अर्थखात्यावर शिवसेनेचा 'वॉच' असेल, अशी चर्चा सुरू आहे. राज्याच्या दोन उपमुख्यमंत्र्यांमध्ये अशी रस्सीखेच आणि मानापमान नाट्य चालू असल्याने तो एक चर्चेचा विषय झाला आहे.

### शिंदे अजित पवारांच्या भेटीला ?

निधी वाटपाच्या मुद्द्यावरून मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी अजित पवारांची भेट घेतली असल्याचे वृत्त आहे. त्या आधी शिंदेंचे मंत्री उदय सामंत यांनीही अजित पवारांची भेट घेऊन चर्चा केली होती. या भेटीमध्ये निधी वाटपावरुन चर्चा झाल्याची माहिती आहे. तथापि, या मुद्द्यावर दोघांमध्ये कोणतीही नाराजी नाही, असेही सांगण्यात येते.

### निधी वाटपावरुन आधीही नाराजी...

अजित पवार आपल्याला निधी देत नाहीत, अशी तक्रार करत शिवसेनेच्या मंत्र्यांनी या आधीही नाराजी व्यक्त केली आहे. शिवसेनेच्या मंत्र्यांनी या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचीही भेट घेतली होती. परंतु, निधी हा काही आपल्या खिशातून देत नाही, राज्याच्या तिजोरीला शिस्त आणण्यासाठी काही पावले उचलली जातात, असे अजित पवारांनी या आधी स्पष्ट केले होते.

### भाजपच्या मंत्र्यांचीही तक्रार!

अजित पवारांच्या निधी वाटपावर फक्त शिवसेनेच्याच नव्हे तर भाजपच्या आमदारांनीही नाराजी व्यक्त केली आहे. अमित शाह नांदेडच्या दौऱ्यावर असताना भाजपच्या आमदारांनी त्यांच्याकडे स्टेजवरच तक्रार केली होती, हा मुद्दा अगदी ताजा आहे.

# पुण्यात अजित पवारांचा डबल धमाका!

## ठाकरेंसह काकांच्या पक्षाला जबर धक्का

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. हडपसर विधानसभा मतदारसंघात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पकड मजबूत केली आहे. हडपसर विधानसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला मानला जातो, तिथेच अजित पवारांच्या पक्षाने आपले वर्चस्व अधिक दृढ करण्यासाठी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.**



हडपसर विधानसभा मतदारसंघाने मागील अनेक महापालिका निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला भक्कम पाठबळ दिला आहे. 2017 च्या महापालिका निवडणुकीत या मतदारसंघातून एकसंध राष्ट्रवादीच्या तब्बल 17 ते 18 नगरसेवकांनी विजय मिळवला होता, जे इतर विधानसभा मतदारसंघांपेक्षा सर्वाधिक होते. यापूर्वीच्या निवडणुकांमध्येही हडपसरमधून राष्ट्रवादीचे नगरसेवक सातत्याने मोठ्या संख्येने निवडून आले आहेत. 2019 मध्ये राष्ट्रवादी एकसंध असताना या मतदारसंघातून चेतन तुपे यांनी विधानसभा निवडणुकीत बाजी मारली होती. पक्षफुटीनंतरही अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीने हडपसरवर आपली पकड कायम ठेवली आणि चेतन तुपे यांनी पुन्हा एकदा विजय मिळवला. आता आगामी महापालिका निवडणुकीच्या तयारीसाठी अजित पवार यांनी हडपसरमधील आपला गड अधिक मजबूत करण्यासाठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. याच रणनीतीचा भाग म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) मधील दोन माजी उपमहापौर आणि एक माजी नगरसेवक अजित पवार यांच्या पक्षात सामील होणार आहेत. माजी उपमहापौर निलेश मगर आणि माजी उपमहापौर बंडू तात्या गायकवाड, तसेच माजी नगरसेवक योगेश ससाने यांचा आज अजित पवार यांच्या पक्षात प्रवेश होणार आहे. विशेष म्हणजे, हडपसर विधानसभा मतदारसंघातूनच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे शहराध्यक्ष प्रशांत जगताप येतात. गेल्या विधानसभा निवडणुकीत प्रशांत जगताप यांचा हडपसर विधानसभा मतदारसंघातून थोड्या मताने पराभव झाला होता. आता त्यांच्याच मतदारसंघातील प्रमुख नेत्यांना अजित पवार यांनी आपल्या गटात सामील करून घेतल्याने हा शहराध्यक्षांसाठीही मोठा धक्का मानला जात आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माळेगाव कारखान्याच्या निवडणुकीत 'ब' वर्गातुन दणदणीत विजय मिळवला आहे. त्यांच्या विजयानंतर माळेगावच्या सभासद आणि कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला आहे. माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीसाठी प्रशासकीय भवन बारामती येथे मतमोजणी पार पडत आहे. या मध्ये ब वर्ग प्रतिनिधीची मतमोजणी प्रारंभी झाली ज्यात उपमुख्यमंत्री अजित पवार हे उमेदवार होते. प्रथम ब वर्गासाठी मतमोजणी झाली.

### एकमेकांवर आरोप करणे टाळले

या वर्गात 99 टक्के मतदान झाले होते. अपेक्षेप्रमाणे सर्व संस्थावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे वर्चस्व असल्यामुळे त्यांना 101 त्यापैकी तब्बल 91 एवढी मते पडली तर विरोधी सहकार बचाव पॅनलच्या उमेदवारांना 10 एवढीच मते मिळाली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा दणदणीत विजय झाल्याने सभासद व कार्यकर्ते यांनी आनंदोत्सव साजरा केला. माळेगावच्या निवडणूकीत निलकंठेश्वर, सहकार बचाव या पॅनेलसह राष्ट्रवादीच्या शरदचंद्र पवार गटाचा बळीराजा सहकार बचाव पॅनेल, शेतकरी कष्टकरी समितीचा पॅनेल रिंगणात आहेत. निवडणूकीत एकमेकांवर मोठे आरोप झाले. परंतु त्यात दोन्ही पवारांनी एकमेकांवर आरोप करणे टाळले.

# लघुविमानांसाठी स्वतंत्र हवाई वाहतूक धोरण

## केंद्रीय मंत्री किंजारापू राममोहन नायडू यांची माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशात विमानतळ नसलेल्या ठिकाणी हेलिकॉप्टर आणि लघु विमानांच्या उड्डाणांची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी लवकरच स्वतंत्र हवाई वाहतूक धोरण राबविण्यात येणार आहे,' अशी माहिती केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री किंजारापू राममोहन नायडू यांनी मंगळवारी येथे दिली.**



नायडू एका कार्यक्रमानिमित्त पुण्यात आले असता, पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, 'उडान योजनेमुळे हवाई क्षेत्रात अनेक बदल झाले आहेत. मात्र, भौगोलिक आणि निसर्गरचनेनुसार डोंगराळ, दुर्गम भागात हेलिकॉप्टर आणि लघु विमानांना अडथळे येत आहेत. त्यासाठी स्वतंत्र वाहतूक धोरणाची आवश्यकता आहे. विमानतळ नसलेल्या भागात नागरी विमान वाहतूक महासंचालनालयातर्फे (डीजीसीए) पायाभूत सुविधा विकसित करून हवाई क्षेत्रातील दळणवळण सुविधा आणखी सुलभ करण्यात येणार आहे.'भौगोलिक आणि निसर्गसंपन्नता लाभलेल्या प्रदेशांना जोडण्यासाठी विविध यंत्रणांची गरज आहे. विमानतळ उभारणे शक्य नाही, अशा दुर्गम भागात हेलिकॉप्टरचा वापर वाढवण्यावर भर दिला जाणार आहे,' असे ते म्हणाले.चारधाम यात्रेच्या ठिकाणांवर खराब हवामान आणि डोंगराळ प्रदेश असल्याने हेलिकॉप्टरला अडथळे येत आहेत. तसेच, दुर्घटना टाळण्यासाठी हवाई वाहतूक व्यवस्थापनात (एटीएमएस) 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे,' असेही किंजारापू राममोहन नायडू यांनी सांगितले.पुणे, मुंबई, अहमदाबाद यांसारख्या गर्दीच्या विमानतळ परिसरात बेकायदा बांधकामे वाढली आहेत. त्यामुळे हवाई अपघातांची शक्यता असून, उड्डाणांमध्येही अडथळे येत आहेत. त्यामुळे राज्य आणि स्थानिक पातळीवर प्रतिबंधित क्षेत्रासंदर्भात नगररचना विभागाच्या कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याबाबत आदेश देण्यात आले असल्याचे किंजारापू राममोहन नायडू यांनी स्पष्ट केले.नायडू एका कार्यक्रमानिमित्त पुण्यात आले असता, पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले,'उडान योजनेमुळे हवाई क्षेत्रात अनेक बदल झाले आहेत. मात्र, भौगोलिक आणि निसर्गरचनेनुसार डोंगराळ, दुर्गम भागात हेलिकॉप्टर आणि लघु विमानांना अडथळे येत आहेत. त्यासाठी स्वतंत्र वाहतूक धोरणाची आवश्यकता आहे. विमानतळ नसलेल्या भागात नागरी विमान वाहतूक महासंचालनालयातर्फे (डीजीसीए) पायाभूत सुविधा विकसित करून हवाई क्षेत्रातील दळणवळण सुविधा आणखी सुलभ करण्यात येणार आहे.'भौगोलिक आणि निसर्गसंपन्नता लाभलेल्या प्रदेशांना जोडण्यासाठी विविध यंत्रणांची गरज आहे. विमानतळ उभारणे शक्य नाही, अशा दुर्गम भागात हेलिकॉप्टरचा वापर वाढवण्यावर भर दिला जाणार आहे,' असे ते म्हणाले.

### 'सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य'

चारधाम यात्रेच्या ठिकाणांवर खराब हवामान आणि डोंगराळ प्रदेश असल्याने हेलिकॉप्टरला अडथळे येत आहेत. तसेच, दुर्घटना टाळण्यासाठी हवाई वाहतूक व्यवस्थापनात (एटीएमएस) 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे,' असेही किंजारापू राममोहन नायडू यांनी सांगितले.पुणे, मुंबई, अहमदाबाद यांसारख्या गर्दीच्या विमानतळ परिसरात बेकायदा बांधकामे वाढली आहेत.

## महापालिकेला मेट्रो कडून पत्र

# मेट्रोसाठी आता 162 झाडांची कत्तल!

### पर्यावरण प्रेमींकडून तीव्र विरोध

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी ते निगडी मेट्रो ट्रॅकला अडथळा ठरणारी १७ झाडे तोडण्याची परवानगी यापूर्वीच महापालिकेने दिली असतानाच, चार मेट्रो स्टेशनला अडथळा ठरणारी तब्बल १६२ झाडे तोडण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करणारा प्रस्ताव महामेट्रोने महापालिकेच्या उद्यान विभागाला सादर केला आहे. त्यामुळे मेट्रोचे काम शहरातील झाडांच्या मुळावर आल्याची टीका वृक्षप्रेमींकडून होऊ लागली आहे.**



पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरी ते दापोडी या साडेसात किलोमीटर मार्गावर मेट्रो धावत आहे. पिंपरी, संत तुकारामनगर, नाशिक फाटा, कासारवाडी, फुगेवाडी आणि दापोडी ही सहा मेट्रो स्टेशन्स आहेत. या मार्गावर काम करताना मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली. असे असतानाच, आता दुसऱ्या टप्प्यात पिंपरी ते निगडीच्या भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकापर्यंत ४.५ किलोमीटर अंतर मेट्रो मार्ग विस्ताराचे काम सुरू आहे. त्यासाठी ९१० कोटी १८ लाखांचा खर्च करण्यात येणार आहे.

या मार्गावर चिंचवड स्टेशन, आकुर्डीत खंडोबा माळ चौक, निगडीतील टिळक चौक आणि भक्ती-शक्ती समूह शिल्प, अशी चार स्टेशन्स करण्यात येणार आहेत. त्यासाठी ग्रेडसेपरेटरच्या सर्व्हिस रस्त्यावर काम करण्यात येत आहे.

या मार्गिकेसाठी निगडी येथील अनेक झाडे तोडण्यात आली आहेत. तसेच मेट्रो ट्रॅकला अडथळा ठरणारी १७ झाडे तोडण्याची परवानगी यापूर्वीच महामेट्रो प्रशासनाने पालिकेकडून घेतली आहे.त्यानंतर आता स्टेशन उभारण्यासाठी अडथळा ठरणाऱ्या चिंचवड स्टेशनसह या मार्गावरील १६२ झाडे तोडण्यासाठी महामेट्रो प्रशासनाने पालिकेच्या उद्यान विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे. त्यामुळे या १६२ झाडांवर कुऱ्हाड पडण्याची शक्यता असून, वृक्षप्रेमींमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. तसेच पर्यावरणाची हानी न करता मेट्रोने काम करावे, अशी मागणीही केली आहे.

> पिंपरी ते निगडी मेट्रो ट्रॅकला अडथळा ठरणारी १७ झाडे तोडण्याची परवानगी दिली आहे. त्यानंतर मेट्रोने स्टेशनला अडथळा ठरणारी १६२ झाडे तोडण्यासाठी परवानगी द्यावी, याबाबतचा प्रस्ताव आला आहे. यावर अद्यापि निर्णय झालेला नाही. पुढील वृक्षसंवर्धन समितीच्या बैठकीत याबाबत निर्णय होईल. तसेच एखादे झाड २० वर्षांचे असेल तर त्याबदल्यात २० झाडांची लागवड मेट्रो प्रशासनाकडून करून घेण्यात येणार आहे.
> **-उमेश ढाकणे,** सहायक आयुक्त, उद्यान विभाग.

> मेट्रो मार्गिका व स्टेशनच्या कामासाठी अडथळा ठरणारी झाडे हटविण्यात येणार आहेत. त्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या उद्यान विभागाकडून रितसर परवानगी घेण्यात येणार आहे. त्यातील काही झाडांचे पुनर्रोपण केले जाणार आहे. उद्यान विभागाच्या नियमानुसार एका झाडाच्या बदल्यात किती झाडे लावायची, त्यानुसार कार्यवाही केली जाईल.
> **-हेमंत सोनवणे,** संचालक महामेट्रो.

---

## पाकिस्तानला मदत करणाऱ्या देशांच्या उत्पादनांवर बंदी घाला

### भाजपची मागणी; शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचे आयुक्तांना पत्र

**- महापालिकेच्या विकास कामांसाठी 'या' देशांची उत्पादने नको**

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुलवामा हल्ल्यानंतर पाकिस्तानशी सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, पाकिस्तानला अप्रत्यक्ष किंवा प्रत्यक्ष मदत करणाऱ्या तुर्की, अझरबैजान आणि चीन या देशांच्या उत्पादनांवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात बंदी घालण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांना यासंदर्भात एक लेखी पत्र दिले आहे. महापालिकेच्या विविध विकासकामांमध्ये आणि इतर सरकारी कामांमध्ये या देशांच्या उत्पादनांचा वापर तातडीने थांबवण्यात यावा, अशी मागणी काटे यांनी पत्राद्वारे केली आहे.**



शत्रुघ्न काटे यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, “पुलवामा हल्ल्यानंतर पाकिस्तानबरोबर झालेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर देशातील जनतेच्या भावना अत्यंत तीव्र आहेत.

पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या तुर्की, अझरबैजान आणि चीन या देशांच्या उत्पादनांवर बंदी घालण्याचे सरकार आणि समाजातील विविध घटकांकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष निर्देश आहेत. या तीव्र भावना लक्षात घेता, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व सरकारी कामांमध्ये, विशेषतः महापालिका क्षेत्रातील विविध विकास प्रकल्पांमध्ये आणि इतर कामांमध्ये तुर्की, अझरबैजान आणि चीनमधील कंपन्यांची उत्पादने वापरली जाऊ नयेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. या मागणीची दखल न घेतल्यास गंभीर परिणामांचा इशाराही काटे दिला आहे.

“या देशांतील कंपन्यांच्या उत्पादनांचा वापर महापालिकेकडून केला जात असल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल आणि त्याविषयी आंदोलन व अन्य मार्गाने अशी कामे न होण्याबाबत आम्ही योग्य ती भूमिका घेऊ,” असे काटे यांनी पत्रात म्हटले आहे. त्याचबरोबर, आयुक्तांनी महापालिकेच्या सर्व विभागांना या संदर्भात तातडीने सूचना द्याव्यात आणि विकास प्रकल्पांमध्ये व अन्य कामांमध्ये या देशांतील उत्पादने वापरली जाणार नाहीत याची खबरदारी घेतली जाईल, याची खात्री करावी, अशी विनंतीही काटे यांनी केली आहे.


**“गंभीर परिणामांची शक्यता”**

या मागणीची दखल न घेतल्यास पुढे आंदोलनात्मक भूमिका घेण्यात येईल, असा इशाराही काटे यांनी दिला आहे. “महापालिकेच्या विविध विभागांनी अशा कंपन्यांची उत्पादने वापरणे थांबवावे. आयुक्तांनी याबाबत तातडीने स्पष्ट सूचना द्याव्यात,” अशी मागणी त्यांनी केली आहे.

**विकासकामांमध्ये स्वदेशीला प्राधान्य देण्याचा आग्रह**

काटे यांनी पुढे नमूद केले की, “स्वदेशी उत्पादने आणि भारतीय तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. आपले पैसे अप्रत्यक्षपणे देशविरोधी शक्तींना मदत करणाऱ्या देशांकडे जाणे ही दुर्दैवी बाब आहे. म्हणूनच महापालिकेच्या माध्यमातून देशहिताला प्राधान्य देणे आवश्यक आहे.” या मागणीमुळे महापालिकेच्या खरेदी धोरणात आणि विकास प्रकल्पांमध्ये कोणते बदल होतील, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने »



### ज्ञान हे दुहेरी शस्त्र आहे

लोककल्याणाच्या तळमळीने जो ग्रंथ लिहितो तो खरा ग्रंथकार होय; वाचनात आलेले आचरणात आणून जो लोकांना सांगतो तो खरा वक्ता होय; आणि सांगितलेले जो आचरणात आणतो तोच खरा श्रोता आणि साधक होय. अलीकडे ज्ञानप्रसाराची अनेक साधने उपलब्ध झाली आहेत. त्यामुळे नको त्या ज्ञानाचाही विस्तार झपाट्याने होतो आहे. ज्ञान हे एक प्रकारचे दुहेरी शस्त्र आहे. कोणत्याही ज्ञानाचा बरावाईट उपयोग, तो करणाऱ्यावर अवलंबून असतो. ज्ञान हे मुळात पवित्र आहे. जे ज्ञान नीती आणि धर्म यांच्या पायावर उभे असते ते जास्त प्रभावी ठरते. सर्वांचे एकमेकांवर प्रेम वाढेल आणि सर्वजण एकत्र येतील असे ज्ञान असावे. श्रीमंत-गरीब, विद्वान्-अशिक्षित, लहान-थोर, स्त्री-पुरुष या सर्वांना एकमेकांबद्दल प्रेम, आदर आणि आपुलकी वाढेल, असे ज्ञान व्यक्त झाले पाहिजे. द्वेष-मत्सर वाढवील, नीतिधर्माला फाटा देईल, असे ज्ञान पुस्तकात नसावे. विद्वान् शास्त्रज्ञ नवीन शोध लावून जगाला स्वार्थी आणि लोभी बनवितात, आणि त्यामुळे सर्वनाश होतो. जे ज्ञान समाधान देत नाही ते खरे ज्ञान नव्हे. जगाचे खरे स्वरूप ज्याने कळते ते खरे ज्ञान होय.

देहासंबंधी जे ज्ञान ते व्यावहारिक ज्ञान; जे जसे आहे तसे ओळखणे हे तत्त्वज्ञान. मी देहाला ‘ माझा’ म्हणतो, अर्थात मी देह नव्हे. ‘ माझे घर ’ म्हणणारा ‘ मी ’, घराहून वेगळा ठरतो ! जडत्व म्हणजे काय ? देहाच्या ठिकाणी ममत्व हे जडत्व. पदार्थाचे यथार्थ ज्ञान ज्याला आहे तो शहाणा. व्यवहाराचे गूढ ज्याला कळते तो प्रपंची; जगाचे गूढ ज्याला कळते तो तत्त्वज्ञानी. सूक्ष्माचे ज्ञान होणे यात सुख आहे. आत्मा हा समुद्र आहे, तर जीव हा त्याचा अगदी लहान थेंब आहे. त्याची ओळख होऊन आत्म्याशी समरस होणे हेच खरे तत्त्वज्ञान आहे. ‘ ब्रह्म सत्यं, जगन्मिथ्या ’ अशा ज्ञानाच्या गोष्टी कळायला कठीण असल्या, तरी अभ्यासाने दीर्घ काळानंतर कळतील; पण नामाचे महत्त्व कळणार नाही; ते एक संतकृपेनेच कळते. नामावर विश्वास बसणे महाभाग्याचे लक्षण आहे. आपण बुद्धिभेदापासून सावध, दूर राहिले पाहिजे. संतवचनावर विश्वास ठेवून अखंड नाम घ्यावे; त्यानेच समाधान लाभेल.

ज्या ग्रंथांच्या श्रवणाने भगवंताविषयी प्रेम उत्पन्न होते, ज्याच्या योगाने विरक्ती उत्पन्न होते, अनीतीचे वर्तन टाकून नीतिमार्ग, धर्ममार्ग, याचा अवलंब करावासा वाटतो, ते सद्ग्रंथ; उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरी, दासबोध, नाथभागवत. हे ग्रंथ सदोदित वाचून त्यांचे मनन करणे, हेच फार जरुरीचे आहे; त्याने ईश्वरप्रेम उत्पन्न होते.

**बोधवचन:-** अत्यंत कठीण प्रमेये असलेले जगातले ग्रंथ वाचावेत, पण शेवटी अत्यंत सोप्यातले सोपे असे नामच घ्यावे.

# हिंदी भाषेच्या मुद्द्यावरून, आदळआपट कशासाठी ?



**‘स्टेट’मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**
संस्थापक, संपादक




**राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मुंबईत हिंदी सक्ती विरोधात आंदोलन केले. शाळांबाहेर बाहेर स्वाक्षरी मोहीम झाली आणि हिंदी ही पहिलीपासून अनिवार्य भाषा करण्याच्या सरकारच्या छुप्या धोरणाला विरोध केला. मनसेने केलेला हा विरोध सक्तीने हिंदी लादली तर नक्कीच योग्य आहे. मात्र, सक्ती नसताना आणि एकूण पंधरा भाषांपैकी एक भाषा निवडण्याचा पर्याय असताना केवळ राजकीय अभिनिवेशापोटी विरोध करणे चुकीचे आहे, असे म्हणण्याची वेळ आली आहे!**

### धोरण ठरले, तेव्हा गप्प का?

हिंदी भाषा सक्तीचा विचार करताना नवे शैक्षणिक धोरण ठरवले, तेव्हा यावर सगळ्या पक्षांनी, शिक्षण महर्षींनी, तज्ज्ञांनी, नेत्यांनी आणि विचारवंतांनी आपली मते का मांडली नाहीत? कोणत्याही धोरणाचा त्याची अंमलबजावणी करताना राजकीय पक्ष, त्याचे नेते जागे होतात आणि विरोध करायला लागतात. नवे शिक्षण घोरण २०१९-२० मध्ये सुरु झाले. त्यानंतर २०२४ मध्ये अहवाल जाहीर करण्यात आला. जून महिन्यात शाळा सुरु होताना आंदोलन करण्याची बुद्धी या मंडळींना का होते, हे समजत नाही.

### राजकीय पोळी भाजायची सवय !

पुढील पाच वर्षे दर वर्षी दोन इयत्ता शिक्षणाच्या धोरणाच्या बदलत येणार आहेत. दरवर्षी त्याच तिकिटावर तोच खेळ करणार का? हा सगळा प्रकार खरोखर मुलांच्यासाठी आहे की स्वतःच्या राजकारणासाठी आहे, याचे प्रामाणिक उत्तर द्यायला पाहिजे, जे कधीही मीळणार नाही..धोरण ठरवताना डोळ्यात तेल घालून काम करणे, हे पण त्यांना जमणार नाही. त्रिभाषा धोरण संदर्भात काही दिवसांपूर्वी लिहिले होते. त्यावेळीही हा प्रकार राजकारणाच्या पलीकडे जाऊन व्हायला पाहिजे, असे म्हटले होते. लहान मुलांना शिकवणे आणि त्यांचा अभ्यासक्रम ठरवणे, हा प्रकार राजकारणी करू शकत नाहीत. त्यासाठी शिक्षणातले तज्ज्ञ पाहिजेत. सरकारने त्यांच्याकडून उत्तम का, त्यांचे आर्थिक विषय आणि आवश्यक ती संसाधने दिली पाहिजेत. मुलांना पाठ्यपुस्तके, पिण्याचे पाणी, उत्तम शिक्षक आणि वाचनालय, प्रयोगशाळा, मैदाने दिली पाहिजेत. त्यासाठी आंदोलन करणे आवश्यक आहे.

### मुलांचा कल पाहायला हवा..

साहित्य, कल, संगीत याकडे मुले कशी वळतील,याचा विचार केला पाहिजे पण हे होत नाही. नको त्या मुद्यांवर जास्त चर्चा होते. मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांत पहिलीपासून हिंदी भाषा शिकण्याच्या सक्तीला राज्यातून जोरदार विरोध झाल्यानंतर आणि ती दूर करण्याचे आश्वासन शालेय शिक्षणमंत्र्यांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वांनी दिले, ते का दिले आणि पुन्हा अप्रत्यक्षरीत्या हिंदी लादण्याचा झालेला निर्णय अनाकलनीय होता. कोणत्यातरी एका मुद्यावर सरकारने ठाम राहायला पाहिजे होते. मुख्य म्हणजे ज्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून हे केले जात आहे, त्या धोरणाशीही हे सुसंगत आहे का? रद्द केलेला निर्णय रास्त आहे का? याची उत्तरेच मिळत नाहीत.

### हिंदीची कायम असल्याचे दिसते..

शिक्षणातील त्रिभाषा सूत्र नवीन नसले आणि त्याचाच पुनरुच्चार ‘एनईपी’ त झाला असला, तरी पहिलीपासून तिसरी भाषा शिकवा, असे त्यात नमूद करण्यात आलेले नाही. कोणतीही भाषा लादली जाणार नसल्याचेही ‘एनईपी’ त स्पष्ट करण्यात आले आहे. ‘एनईपी’ ची आपल्याला अनुकूल पद्धतीने अंमलबजावणी करण्याचे अधिकार राज्याला असले, तरी पहिलीपासून हिंदीची सक्ती अनाठायी होती. विरोधानंतर ही सक्ती दूर करण्याचे आश्वासन दिले गेले. मात्र, त्याच्या पूर्ततेसाठीचा शासन निर्णय पाहिल्यावर हिंदीची सक्ती कायम असल्याचेच दिसते.

### सारा खटाटोप कशासाठी ?

हिंदीऐवजी अन्य भाषा शिकू इच्छिणाऱ्यांची संख्या वीस नसल्यास त्यांना त्यांची भाषा शिकता येणार नाही. हिंदीच शिकावी लागेल. विद्यार्थ्यांची संख्या वीस झाल्यावरही संबंधित भाषेचे शिक्षक न मिळाल्यास ‘ऑनलाइन’ पद्धतीने ती भाषा शिकावी लागेल. हा सारा खटाटोप करायचा नसेल, तर हिंदी शिका, हा याचा अर्थ. मुळात पहिलीपासून तिसरी भाषा शिकवण्याची गरज नसताना एक अतिरिक्त विषय विद्यार्थ्यांवर लादणे चुकीचे आहे. ही चूक दुरुस्त करण्याची आवश्यकता असताना पहिलीपासून हिंदी शिकण्याला पर्याय निर्माण करण्याचा भास निर्माण करण्यात आला आहे.

### एवढे अवडंबर कशासाठी ..

आता हे झाले विरोधकांचे मत. मात्र, वाहिन्यांवर मुलांना हिंदी भाषेबद्दल विचारले असता त्यांना कोणत्याच भाषेत नीट उत्तरे देता आली नाहीत, हे वास्तव आहे. तसेच हिंदी पहिली ते चौथी केवळ बोली भाषा म्हणून शिकवली, तर ओझे होणार नाही आणि राज्याच्या धोरणाप्रमाणे तिसऱ्या भाषेचे जे विचार सांगितले आहेत, ते पूर्ण होतील. लहान मुले नव्या गोष्टी पटपट शिकतात, विशेषतः नवीन भाषा ती तुलनेने लवकर आत्मसात करतात हे खरे.. यामुळे पहिलीपासून त्यांना तीन भाषा शिकविणे, यात फार मोठा अवडंबर असलेला भाग नाही. त्याचा अभ्यासक्रम योग्य पद्धतीने केला पाहिजे. शाळेत आणि शाळेबाहेर अनौपचारिक पद्धतीने मुले भाषांसह अनेक गोष्टी शिकतात. त्यांना तसे शिकू दिले जावे. मात्र, औपचारिक पद्धतीने शिक्षण देताना त्यांच्यावर विषयांचे आणि अभ्यासाचे ओझे होणार नाही, हे पाहिले जावे, हे अतिशय महत्त्वाचे आहे.

### भाषा शिकण्यात आनंद असावा..

भाषा ओळख आनंदानी स्वीकारली जावी, असे शिक्षण दिल्यास वादाचा मुद्दा राहणार नाही आणि राजकारण केले जाणार नाही. त्यातील राजकारण सोडले तर कोणतीही भाषा ही सौंदर्याचे लेणे घेऊन येते. सर्वांनीच एकत्र बसून यावर योग्य मार्ग काढला, तर वाद होणार नाहीत आणि भाषावाद संपला तर वादावादीही होणार नाही, हे राजकारण्यांनी लक्षात घ्यायला हवे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सोळशी प्रकल्पाला पंधरा गावांचा विरोध

## महाबळेश्वर तालुक्यातच पुनर्वसन करण्यात यावे

**। मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**महाबळेश्वर तालुक्यातील येरणे खुर्द, येरणे बुद्रुक, आचली, मजरेवाडी, देवसरे, घावरी, विवर आणि सौंदरीसह पंधरा प्रकल्पग्रस्त गावांनी सोळशी धरण प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शवला आहे. स्थानिकांच्या मागण्या मान्य केल्याशिवाय धरण प्रकल्पास कोणतीही संमती दिली जाणार नाही, असा ठराव नवी मुंबई येथील घणसोली येथे आयोजित केलेल्या बैठकीत सोळशी सामाजिक संघर्ष समितीने केला.**



या बैठकीत माजी सभापती संजय बाबा गायकवाड यांनी सांगितले की, राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्याशी थेट संवाद साधून गावकऱ्यांच्या मागण्या पोहोचवल्या असून, आपल्याला शंभर टक्के न्याय मिळेल. बैठकीसाठी या प्रकल्पग्रस्त गावांतील ग्रामस्थ उपस्थित होते. आमचा विकासाला विरोध नाही, पण जमिनींचा योग्य मोबदला, महाबळेश्वर तालुक्यातच पुनर्वसन आणि हक्काची घरे मिळाल्याशिवाय प्रकल्पास मान्यता नाही, असा ठाम सूर बैठकीतून उमटला. सोळशी सामाजिक संघर्ष समितीने लढ्याचे नेतृत्व करण्याचा निर्धार व्यक्त करत न्याय न मिळाल्यास तीव्र लोकशाही आंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे. या बैठकीला महाबळेश्वर पंचायत समितीचे माजी सभापती संजय गायकवाड, सोळशी सामाजिक संघर्ष समितीचे अध्यक्ष विश्वनाथ घाडगे, शिवसेना महाबळेश्वर तालुकाप्रमुख संतोष आप्पा जाधव, बारा गावं संघर्ष समिती प्रमुख प्रकाश गायकवाड, शिवसेना उपविभाग प्रमुख रमेश सकपाळ, शिवसेना शाखाप्रमुख गोरेगाव विभाग अंकुश मोरे, उद्योजक विलास जाधव, अरुण मोरे, संघर्ष समितीचे उपाध्यक्ष श्रीरंग मोरे, विश्वनाथ घाडगे, रमेश जाधव, सुनील जाधव, तानाजी सकपाळ, प्रकाश सकपाळ, राजेंद्र घाडगे- पाटील, महेंद्र घाडगे, सतीश मोरे, अरुण मोरे,रमेश जाधव, चंद्रकांत जाधव, गणेश गायकवाड, सुनील जाधव, शैलेश जाधव, नितीन दादा घाडगे, सुनील गुरुजी आदी ग्रामस्थ उपस्थित होते. सोळशी (ता. महाबळेश्वर) गावासह पंधरा गावांत सोळशी धरण उभारले जाणार आहे. या भागातील कोयना धरणाच्या शिवसागर जलाशयात जाणारे पाणी अडवून बोगद्यामार्गे बलकवडी(ता वाई) धरणात सोडण्यात येणार आहे. या धरणाचे पाणी सातारा जिल्ह्यातील दुष्काळी भाग व फलटण मार्गे मराठवाड्याकडेही नेण्याचा प्रस्ताव आहे. या धरणग्रस्तांचे महाबळेश्वर तालुक्यातच पुनर्वसन करण्यात यावे, अशी या गावातील धरणग्रस्तांची प्रमुख मागणी आहे. या भागाचे लोकप्रतिनिधी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांचा धरणग्रस्तांच्या मागणीला पाठिंबा आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडेही मकरंद पाटील आणि प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. या बैठकीत माजी सभापती संजय बाबा गायकवाड यांनी सांगितले की, राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्याशी थेट संवाद साधून गावकऱ्यांच्या मागण्या पोहोचवल्या असून, आपल्याला शंभर टक्के न्याय मिळेल. बैठकीसाठी या प्रकल्पग्रस्त गावांतील ग्रामस्थ उपस्थित होते. आमचा विकासाला विरोध नाही, पण जमिनींचा योग्य मोबदला, महाबळेश्वर तालुक्यातच पुनर्वसन आणि हक्काची घरे मिळाल्याशिवाय प्रकल्पास मान्यता नाही, असा ठाम सूर बैठकीतून उमटला.

### सोळशी धरण प्रकल्प काय आहे?

सोळशी सामाजिक संघर्ष समितीने लढ्याचे नेतृत्व करण्याचा निर्धार व्यक्त करत न्याय न मिळाल्यास तीव्र लोकशाही आंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहेसोळशी सामाजिक संघर्ष समितीचे अध्यक्ष विश्वनाथ घाडगे, शिवसेना महाबळेश्वर तालुकाप्रमुख संतोष आप्पा जाधव, बारा गावं संघर्ष समिती प्रमुख प्रकाश गायकवाड, शिवसेना उपविभाग प्रमुख रमेश सकपाळ, शिवसेना शाखाप्रमुख गोरेगाव विभाग अंकुश मोरे, उद्योजक विलास जाधव, अरुण मोरे, संघर्ष समितीचे उपाध्यक्ष श्रीरंग मोरे, विश्वनाथ घाडगे, रमेश जाधव, सुनील जाधव, तानाजी सकपाळ, प्रकाश सकपाळ, राजेंद्र घाडगे- पाटील, महेंद्र घाडगे, सतीश मोरे, अरुण मोरे,रमेश जाधव, चंद्रकांत जाधव, गणेश गायकवाड, सुनील जाधव, शैलेश जाधव, नितीन दादा घाडगे, सुनील गुरुजी आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# कर्नाटक सरकारचे 'अलमट्टी'धोरण पूर

## महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात जाण्याची मागणी

**। मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**कर्नाटक सरकारचे "अलमट्टी" धोरण पूर वाढवणारे असून, अलमट्टी धरणाची जलपातळी १५ ऑगस्टपर्यंत ५०९ मीटरवर ठेवावी, अन्यथा महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात जावे अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते, माजी खासदार राजू शेट्टी यांनी कराडमध्ये पत्रकार परिषदेत केली. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नावर सरकार पळ का काढते? असा सवाल त्यांनी केला.**




शेट्टी म्हणाले, कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणाची पाणी पातळी ५२४ मीटरवर स्थिर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यातून पाण्याचा प्रवाह आणखी संथ होत असून, कृष्णा खोऱ्यातील अनेक भागांमध्ये पुराची तीव्रता वाढते. 'अलमट्टी'च्या अलीकडे पाण्याचा प्रवाह संथ होतो. अशा वेळी 'अलमट्टी'ची पातळी १५ ऑगस्टपर्यंत ५०९ मीटरवर ठेवणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, पाण्याची फुग तयार होऊन २५- ३० दिवस पूर रेंगाळतो. हे टाळण्यासाठी महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात जावे. यंदा मान्सूनपूर्व पावसामुळे सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये पुराचा गंभीर धोका आहे. कृष्णा आणि तिच्या उपनद्यांमध्ये जलपातळी वाढण्याची शक्यता आहे. नदीप्रवाहातील कृत्रिम अडथळे, अयोग्य धरण व्यवस्थापन, नव्याने उभारले जाणारे पूल यामुळे पूरस्थिती रेंगाळते. त्याचे गंभीर परिणाम होतात तरी यावर त्वरित उपाययोजना न केल्यास जनआंदोलन उभारण्याचा इशाराही शेट्टींनी सरकारला दिला, संगनमताने पूल उभे राहतात. नद्यांच्या काठावर भराव टाकले जातात. परिणामी पाण्याचा निचरा न झाल्याने पूर तीव्र होतो, असा आरोपही शेट्टी यांनी केला. हिप्परगी बॅरेजच्या भरावामुळे नदीपात्रातील पाणी वाहून न जाता तुंबते, त्यामुळे कराड व वाळवा तालुक्यात पूर वाढतो. याशिवाय चिप्परगी (मांजरी) भागातही हेच चित्र आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णा नदीवरील अंकली-उमळवाड व दानोळी-सांगलीवाडी हे बांधले जाणारे पूल नदीच्या जलप्रवाहात अडथळा निर्माण करणारे ठरतील

### मेट्रोसाठी पैसे ,शेतकऱ्यांसाठी नाहीत

परिणामी कराड, वाळवा, मिरज, शिरोळ तालुक्यांना पुराचा अधिक फटका बसेल. हे अडथळे दूर करणे गरजेचे आहे. पूर नियंत्रणासाठी ३,२०० कोटींचा निधी जागतिक बँककडून घेऊन त्याचा उपयोग पूर निवारणासाठीच व्हावा. मात्र, पालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून तो निधी गटार बांधणीसारख्या कामांसाठी वापरण्याचे नियोजन सुरू असल्याचा आरोप शेट्टी यांनी केला. कर्जमाफीच्या प्रश्नावर सरकार पळ का काढते? असा सवाल त्यांनी केला. उद्योजकांच्या कर्जमाफीसाठी कुठलीही समिती नव्हती. मग, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठीच नियम, अटी का? बुलेट ट्रेन व मेट्रोसाठी पैसे आहेत, मग शेतकऱ्यांसाठी का नाहीत, असा संतप्त सवाल शेट्टी यांनी केला. सध्या ६५ मिमी पावसावर अतिवृष्टीची नोंद होते. मात्र, दोन- चार दिवस सलग तेवढाच पाऊस पडल्यास होणारे नुकसान लक्षात घ्यायला हवे.

# इराण-इस्रायल अखेर शस्त्रसंधी

## घोषणेनंतरही हल्ला केल्यामुळे ट्रम्प नेतान्याहूंवर बरसले!

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**इस्रायल आणि इराणदरम्यान १२ दिवसांपासून सुरू असलेला संघर्ष थांबवण्यासाठी दोन्ही देशांनी युद्धविरामाचा प्रस्ताव स्वीकारल्याचे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केले. मात्र, त्यानंतर काहीच तासांतच इराणने आपल्यावर क्षेपणास्त्र डागल्याचा आरोप करत इस्रायलने तेहरानवर हल्ला चढविला. त्यामुळे संतापलेल्या ट्रम्प यांनी इस्रायलची खरडपट्टी काढत विमाने तातडीने परत बोलाविण्याचा 'आदेश' इस्रायलला दिला.**



कतार आणि इराकमधील अमेरिकी तळांवर इराणने सोमवारी रात्री हल्ले केल्यानंतर युद्ध चिघळण्याची भीती व्यक्त होत होती. मात्र मंगळवारी ट्रम्प यांनी अचानक इराण आणि इस्रायल युद्धविरामाला तयार झाले असून दोन्ही देशांत शस्त्रसंधी झाला असल्याचे समाजमाध्यमावर जाहीर केले. याला इस्रायल आणि इराणकडूनही दुजोरा देण्यात आला. यामुळे पश्चिम आशियाने मोकळा श्वास घेतला असतानाच इराणने पुन्हा क्षेपणास्त्रे डागल्याचा आरोप इस्रायलने केला.इराणने आरोपाचा इन्कार केल्यानंतरही प्रत्युत्तरादाखल तेहरानवर हवाई हल्ला चढवून तेथील रडार केंद्र नष्ट केल्याचा दावा इस्रायलने केला. त्यावर संतापलेल्या ट्रम्प यांनी समाजमाध्यमावर इस्रायलला खडसावले. "इस्रायल... बॉम्ब टाकणे थांबवा. जर तुम्ही हे थांबविले नाही, तर ते (युद्धविरामाचे) गंभीर उल्लंघन ठरेल. तुमच्या वैमानिकांना लगेच परत बोलवा! आत्ताच्या आत्ता!" असे त्यांनी समाजमाध्यमावर लिहिलेच शिवाय इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांना दूरध्वनी करूनही हल्ला न करण्याबाबत स्पष्ट शब्दांत बजावले. त्यानंतर इस्रायलने हल्ले थांबविण्याचे आश्वासन दिल्याचा दावा 'व्हाईट हाऊस'कडून करण्यात आला. इराणला युद्धविरामासाठी तयार करण्यात कतारने महत्त्वाची भूमिका बजावल्याचे मानले जात आहे.युद्धविराम सुरू झाल्यानंतर साधारण अडीच तासांनी इराणने क्षेपणास्त्रे सोडल्याचे आम्हाला आढळले. तेहरानमधील निमलष्करी आणि सरकारी लक्ष्यांवर हल्ले सुरू करण्याची सूचना मी दिली आहे. इराणने युद्धविरामाचे उल्लंघन केले, पण इस्रायलनेही केले. मी इस्रायलवर नाराज आहे. शस्त्रसंधी झाल्यानंतर इस्रायलने लगेचच हल्ले केले हे मला आवडले नाही. आता मला असे समजले की, इराणने रॉकेट हल्ला केल्याचे वाटल्याने इस्रायलने पुन्हा हल्ला केला. पण हे रॉकेट कुठेही पडले नाही.इजिप्त आणि सौदी अरेबियाने युद्धविरामाच्या घोषणेचे स्वागत केले. संघर्ष थांबवण्यासाठी आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी हे महत्त्वाचे असल्याचे इजिप्तने म्हटले आहे. तर येणाऱ्या दिवसांमध्ये तणाव कमी करण्यासाठी सर्वजण कटिबद्ध असतील अशी आशा सौदी अरेबियाने व्यक्त केलीअमेरिकी तळांवर इराणने सोमवारी रात्री हल्ले केल्यानंतर युद्ध चिघळण्याची भीती व्यक्त होत होती. मात्र मंगळवारी ट्रम्प यांनी अचानक इराण आणि इस्रायल युद्धविरामाला तयार झाले असून दोन्ही देशांत शस्त्रसंधी झाला.

### युद्धविरामाचे स्वागत

याला इस्रायल आणि इराणकडूनही दुजोरा देण्यात आला. यामुळे पश्चिम आशियाने मोकळा श्वास घेतला असतानाच इराणने पुन्हा क्षेपणास्त्रे डागल्याचा आरोप इस्रायलने केला.इराणने आरोपाचा इन्कार केल्यानंतरही प्रत्युत्तरादाखल तेहरानवर हवाई हल्ला चढवून तेथील रडार केंद्र नष्ट केल्याचा दावा इस्रायलने केला. त्यावर संतापलेल्या ट्रम्प यांनी समाजमाध्यमावर इस्रायलला खडसावले. "इस्रायल... बॉम्ब टाकणे थांबवा.' पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांना दूरध्वनी करूनही हल्ला न करण्याबाबत स्पष्ट शब्दांत बजावले. त्यानंतर इस्रायलने हल्ले थांबविण्याचे आश्वासन दिल्याचा दावा 'व्हाईट हाऊस'कडून करण्यात आला.

# हजारो विमान प्रवाशांना फटका

## पश्चिम आशियातील तणावामुळे विविध कंपन्यांची उड्डाणे रद्द

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पश्चिम आशियातील तणावपूर्ण स्थितीचा फटका जगभरातील विमान उड्डाणांना बसला असून, 'एअर इंडिया'सह जगभरातील अनेक विमान कंपन्यांनी उड्डाणे रद्द केली. प्रवाशांना झालेल्या त्रासाबरोबरच विमान कंपन्यांनाही मोठा आर्थिक फटका बसला. मात्र, युद्धविरामाची घोषणा झाल्यानंतर आता बुधवारपासून पश्चिम आशियातील विमान उड्डाणे पुन्हा टप्प्याटप्प्याने सुरू करत असल्याचे 'एअर इंडिया'कडून सांगण्यात आले.**




एअर इंडिया'च्या अनेक विमानांना सध्या तांत्रिक समस्या भेडसावत आहेत. त्याचा फटका उड्डाणांना बसत आहे. याबरोबरच 'एअर इंडिया'ने पश्चिम आशियासह युरोपातील उड्डाणे तात्पुरती रद्द केली होती. ती आता पुन्हा सुरू होत आहेत. अमेरिका, कॅनडामधील पाच ठिकाणी जाणारी उड्डाणेही 'एअर इंडिया'ने रद्द केली. या भागात १५ ठिकाणी कंपनीकडून विमानसेवा दिली जाते.'एअर इंडिया' आणि 'इंडिगो' कंपन्यांनी दिल्ली विमानतळावरून उडणारी किमान २० उड्डाणे सोमवारपासून रद्द केली. तसेच, दिल्लीला येणारी २८ विमानेही रद्द केली.. पश्चिम आशियातील देशांची विमानतळे जशी खुली होत आहेत, तशी सेवा सुरू करीत आहोत, असे 'इंडिगो'ने म्हटले आहे. 'स्पाइसजेट'नेही हवाई हद्द बंद असल्याचा फटका काही उड्डाणांना बसेल, असे म्हटले आहे. न्यूयॉर्क : 'फ्लाइटअवेअर'वरील 'एअर ट्रॅकिंग' डेटानुसार जगभरात २४३ उड्डाणे मंगळवारी रद्द झाली. यामध्ये सर्वाधिक २६ उड्डाणे दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून झाली. तर, सर्व कंपन्यांमध्ये 'एअर इंडिया'ची सर्वाधिक २५ उड्डाणे रद्द करण्यात आली.पश्चिम आशियातील परिस्थिती पाहता 'एअर इंडिया'ने उत्तर अमेरिकेचा पूर्व किनारा आणि युरोपमध्ये जाणारी आणि तेथून परतणारी सर्व उड्डाणे पुढील सूचना येईपर्यंत तातडीने बंद केली आहेत.

### किमान 20 उड्डाणे रद्द केली

उत्तर अमेरिकेतून भारताकडे येणारी विमाने पुन्हा माघारी परतली आहेत. इतर विमाने भारताकडे परतली आहेतएअर इंडिया'च्या अनेक विमानांना सध्या तांत्रिक समस्या भेडसावत आहेत. त्याचा फटका उड्डाणांना बसत आहे. याबरोबरच 'एअर इंडिया'ने पश्चिम आशियासह युरोपातील उड्डाणे तात्पुरती रद्द केली होती. ती आता पुन्हा सुरू होत आहेत. अमेरिका, कॅनडामधील पाच ठिकाणी जाणारी उड्डाणेही 'एअर इंडिया'ने रद्द केली. या भागात १५ ठिकाणी कंपनीकडून विमानसेवा दिली जाते.'एअर इंडिया' आणि 'इंडिगो' कंपन्यांनी दिल्ली विमानतळावरून उडणारी किमान २० उड्डाणे सोमवारपासून रद्द केली. तसेच, दिल्लीला येणारी २८ विमानेही रद्द केली.. पश्चिम आशियातील देशांची विमानतळे जशी खुली होत आहेत, तशी सेवा सुरू करीत आहोत, असे 'इंडिगो'ने म्हटले आहे.

# ट्रेंडिंग गाण्यावर सोनाली कुलकर्णीचा जबरदस्त डान्स

‘वो लडकी है कहा...’ या गाण्याचं नाव जरी घेतलं तरीही डोळ्यासमोर येते ती मराठीसह बॉलीवूड कलाविश्व गाजवणारी सो-कूल अभिनेत्री सोनाली कुलकर्णी. सध्या सोशल मीडियावर संजू राठोडच्या ‘शेकी’ गाण्याने धुमाकूळ घातल्याचं पाहायला मिळत आहे. आता सोनालीला सुद्धा या गाण्याची भुरळ पडली असून, अभिनेत्रीने या गाण्यावर सुंदर डान्स करत सर्वांचं मन जिंकून घेतलं आहे. एप्रिल महिन्याच्या अखेरीस संजू राठोडचं ‘शेकी’ गाणं सर्वत्र प्रदर्शित करण्यात आलं. यापूर्वी संजूच्या ‘नऊवारी’, ‘गुलाबी साडी’, ‘काळी बिंदी’ या गाण्यांनी सोशल मीडियावर रेकॉर्डब्रेकिंग व्ह्यूज मिळवल्याचं पाहायला मिळालं होतं. त्यामुळे ‘शेकी’ गाण्याकडून सुद्धा सर्वांना प्रचंड अपेक्षा होत्या. अवघ्या महिन्याभरातच ‘शेकी’ गाण्याने जगभरात पसंती मिळवली आहे.नेटकऱ्यांपासून ते बॉलीवूड सेलिब्रिटींपर्यंत प्रत्येकजण इन्स्टाग्राम रील्सवर संजू राठोडच्या व्हायरल गाण्यावर डान्स करत असल्याचं पाहायला मिळत आहे. अभिनेत्री सोनाली कुलकर्णीने देखील “एक नंबर तुझी कंबर...” म्हणत संजूच्या ट्रेंडिंग गाण्यावर ठेका धरला. अभिनेत्री या व्हिडीओमध्ये जबरदस्त एनर्जीने डान्स करत असल्याचं पाहायला मिळत आहे.सोनालीने ‘शेकी’ गाण्यावर डान्स करतानाचा व्हिडीओ शेअर करत, “ट्रेंडिंग विथ ट्रेंड... शेकी-शेकी” असं कॅप्शन दिलं आहे. सोनालीच्या डान्स व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. कुशल बद्रिके, नम्रता संभेराव या कलाकारांनी सोनालीच्या डान्स व्हिडीओवर कौतुकास्पद कमेंट्स केल्या आहेत. याशिवाय नेटकऱ्यांनी सुद्धा अभिनेत्रीच्या व्हिडीओवर कमेंट्सचा पाऊस पडला आहे. “अरे वाह! ताई सुंदर डान्स केलात”, “वाह! क्या बात है”, “अमेझिंग डान्स केलात ताई”, “सो-कूल अतिशय छान”, “ऑल टाइम आवडती अभिनेत्री”, “एव्हरग्रीन सोनाली” अशा प्रतिक्रिया नेटकऱ्यांनी अभिनेत्रीच्या डान्स व्हिडीओवर दिल्या आहेत.दरम्यान, सोनाली कुलकर्णीच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं, तर नुकतीच ती ‘सुशीला सुजीत’ चित्रपटात झळकली होती. या सिनेमाचं दिग्दर्शन अभिनेता प्रसाद ओकने केलं आहे. याशिवाय सोनालीने ‘मानवत मर्डर्स’मध्ये साकारलेल्या भूमिकेसाठी नुकताच तिचा नामांकित पुरस्काराने सन्मान देखील करण्यात आला आहे.

## सोनारीकावर गुन्हा दाखल !

काही दिवसांपुर्वी बालकलाकार साईशा भोईरची आई पूजा भोईला आर्थिक फसवणुक केली म्हणुन अटक करण्यात आली. आता आणखी एका अभिनेत्रीने एका व्यक्तीची फसवणुक केल्याचा आरोप करण्यात आलाय. ही अभिनेत्री म्हणजे सोनारीका भदोरिया. सोनारीका भदोरिया हिने देवो के देव या लोकप्रिय टीव्ही मालिकेत अभिनय केलाय. सोनारीकाविरुद्ध आर्थिक फसवणुक झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलाय. सोनारिका भदोरिया ही मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री. सोनारिकाने आजवर अनेक हिंदी मालिकांमध्ये लोकप्रिय भुमिका साकारल्या आहेत. सोनारिका विरोधात माहिम येथील शाहू नगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आलीय. सोनारिका तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक जाहिरात ठेवली होती. त्या जाहीरातीत

## रेवतीचा मराठी गाण्यावर डान्स



झी मराठी वाहिनीवरील अल्पावधीतच लोकप्रिय झालेली मालिका म्हणजे ‘नवरी मिळे हिटलरला’ ही मालिका. या मालिकेत अभिनेत्री वल्लरी विराज आणि राकेश बापट यांच्या मुख्य भूमिका होत्या. काही दिवसांपूर्वीच मालिकेने प्रेक्षकांचा निरोप घेतला. मात्र तरीसुद्धा ही मालिका प्रेक्षकांच्या आठवणीत आहेत. या मालिकेत लीला आणि एजे यांच्यातील खास नात्याला प्रेक्षकांनी पसंती दिलीच; मात्र लीला आणि तिची बहीण रेवती या दोघींचे नातेही प्रेक्षकांना तितकंच भावलं. याचं कारण म्हणजे त्यांचे नाते हे पडद्यावरील मालिकेत जितकं सुंदर होतं, तितकंच ते नातं ऑफस्क्रीनसुद्धा सुंदरच आहे.मालिकेत लीलाची भूमिका साकारणारी वल्लरी आणि रेवतीची भूमिका साकारणारी आलापिनी या दोघीही सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतात. सोशल मीडियावर दोघी त्यांचे अनेक फोटो व व्हिडिओ शेअर करत असतात. विशेष म्हणजे त्या दोघींच्या डान्सला चाहत्यांकडून विशेष पसंती मिळत असते.वल्लरी आणि आलापिनी सोशल मीडियावर त्यांचे अनेक डान्सचे व्हिडिओ शेअर करत असतात आणि त्यांचा प्रत्येक डान्स व्हिडीओ चाहत्यांचे लक्ष्य वेधून घेताना दिसतो. अशातच दोघींनी नुकताच एक नवीन डान्स व्हिडीओ शेअर केला आहे. ‘चिंब भिजलेले’ या लोकप्रिय मराठी गाण्यावरील हा डान्स व्हिडीओ आहे.या व्हिडीओमध्ये दोघींपैकी एकीला (वल्लरी) पाऊस आवडत नाहीय; तर एकीला (आलापिनी) पाऊस प्रचंड आवडत आहे. या संकल्पनेवरच दोघींनी सादरीकरण केलं आहे. बिल्डिंगच्या बाल्कनीमध्ये त्यांनी या गाण्याचं खास सादरीकरण केलं आहे. त्यात दोघींच्या चेहऱ्यावरील हावभाव अगदी कौतुकास्पदच आहेत.वल्लरी आणि आलापिनी यांच्या या डान्स व्हिडीओला अवघ्या काही क्षणांत एक लाख तीन हजार व्ह्यूज मिळाले आहेत. तर दोनशेहून अधिक नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. चाहत्यांनाच नव्हे तर अनेक कलाकारांनासुद्धा या व्हिडीओवर त्यांच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.अभिनेत्री ऋजुता देशमुख, भुमिजा पाटील, विजया बाबर, ऋतुजा जुन्नरकर, सीमा घोगळे यांसह अनेक कलाकारांनी या व्हिडीओवर त्यांना दोघींचंअ डान्स आवडल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. त्याचबरोबर मालिकेच्या अनेक फॅन पेजेसनीसुद्धा या व्हिडीओला लाईक्स आणि कमेंट्सद्वारे पसंती दर्शवली आहे.

## पापाराझींबद्दल काजोलने व्यक्त केला राग


लोकप्रिय अभिनेत्री काजोलने अनेक चित्रपटांमध्ये विविध भूमिका साकारत ९०च्या काळात प्रेक्षकांच्या मनावर जणू राज्य केलं होतं. त्या काळातील ती प्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक होती. तिची व अभिनेता शाहरुख खानची जोडी हिंदी चित्रपटांमधील सुपरहिट जोडी मानली जायची. अशातच सध्या अभिनेत्री चर्चेत आहे ते तिच्या ‘माँ’ या आगामी चित्रपटामुळे. त्यामध्ये ती मुख्य भूमिकेत झळकणार आहे. काजोलने तिच्या ‘माँ’ या चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान काही मुलाखती दिल्या. त्यातील एका मुलाखतीमध्ये तिने पापाराझींबद्दल मत व्यक्त केलं आहे. काजोल नेहमीच ठामपणे तिची मतं मांडत असते. यामध्येसुद्धा तिने पापाराझींबद्दलचं तिचं मत स्पष्टपणे मांडलं आहे. ‘झूम’शी संवाद साधताना ती याबद्दल म्हणाली, “मी स्पष्ट बोलते म्हणून जर तुम्हाला माझी भीती वाटत असेल, तर माझी काहीच हरकत नाही. उलट तुम्ही तर माझा ‘माँ’ चित्रपट पाहिलाच पाहिजे. कारण- आताच्या घडीला व्हिडीओला फार महत्त्व आहे”.काजोल पुढे म्हणाली, “पापाराझींबाबतही तसंच आहे. तुम्ही काहीतरी बोलावं यासाठी ते थांबलेले असतात. कधी कधी तर ते तुम्हाला बोलण्यास भाग पाडतात. तुम्ही चिडणार किंवा बोलणार हे त्यांना माहीत असतं म्हणून मुद्दाम आग्रह केला जातो. पापाराझी फक्त चांगले फोटो किंवा व्हिडीओ काढण्यासाठी थांबलेले नसतात, तर बऱ्याचदा त्यांना कलाकारांच्या प्रतिक्रिया हव्या असतात. जेणेकरून त्यांना त्या त्यांच्या सोईनुसार नकारात्मक पद्धतीनं वापरता येतील. कारण- कलाकरांच्या प्रतिक्रिया मिळाल्यानंतर ते त्यांना हवं तसं शीर्षक देतात”.

# सोनाक्षी सिन्हाने सांगितली झहीर इक्बालबरोबरच्या नात्याची खास गोष्ट

बॉलीवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इक्बाल यांनी गेल्या वर्षी २३ जून रोजी एकमेकांशी लग्नगाठ बांधली. नुकतंच त्यांच्या लग्नाला एक वर्ष पूर्ण झालं. सात वर्षं एकमेकांना डेट केल्यानंतर दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. कुटुंबीय आणि काही जवळच्या मित्रमंडळींच्या उपस्थितीत नोंदणी पद्धतीनं त्यांनी लग्न केलं. त्याच दिवशी या जोडप्यानं भव्य रिसेप्शन पार्टीही आयोजित केली होती. सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इक्बाल यांच्या लव्हस्टोरीत एका प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्याची महत्त्वाची भूमिका आहे आणि हा अभिनेता म्हणजे सलमान खान. स्वत: सोनाक्षीनं याबद्दल सांगितलं आहे. सलमान आमच्या नात्याचा सूत्रधार असल्याची प्रतिक्रिया सोनाक्षीनं नुकतीच एका मुलाखतीत दिली. सलमान खानच्या घरी एका पार्टीत सोनाक्षी व झहीर यांची भेट झाली आणि नंतर दोघांची लव्हस्टोरी



सुरू झाली.पिंकव्हिलाला दिलेल्या मुलाखतीत सोनाक्षीला सलमान



खानविषयी विचारण्यात आले. तिच्या लग्नाबद्दल सलमानला माहीत होते का? आणि त्यावर त्याची काय प्रतिक्रिया होती, असा प्रश्न सोनाक्षीला विचारण्यात आला. यावेळी सोनाक्षी म्हणाली, “सलमान खान खूप आनंदी होता. मला तो खूपच आवडतो. त्याच्यामुळेच झहीर आणि माझी भेट झाली. आमच्या लग्नाचं श्रेय त्यालाही जातं. त्यानंच आमचं नातं जुळवून आणलं का? तर तसं नाही. पण, त्याच्याकडे एका पार्टीत मी झहीरला भेटले. त्यामुळे त्याला मध्यस्थ म्हणू शकतो.

# ऋषभ काही झेल पकडू शकला नाही

## कोणाच्या डोक्यावर फोडलं भारताच्या पराभवाचं खापर?

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शुबमन गिलच्या कसोटी कर्णधारपदाच्या कारकिर्दीची सुरुवात पराभवाने झाली. हेडिंग्ले कसोटीत इंग्लंडने भारताला ५ विकेट्सने पराभूत करत मालिकेत १-० अशी आघाडी मिळवली आहे. टीम इंडियाचे खराब क्षेत्ररक्षण देखील या पराभवाचे मोठे कारण ठरले. शुबमन गिलने भारताच्या या पराभवाचे कारण कोणावर फोडलं आहे, जाणून घेऊया.**




भारतीय संघाच्या वरच्या फळीतील फलंदाजांनी दोन्ही डावात उत्कृष्ट फलंदाजी करत संघाला मोठी धावसंख्या उभारून दिली. यशस्वी जैस्वाल, शुबमन गिल, ऋषभ पंत आणि केएल राहुल यांनी या सामन्यात शतकं केली. तर ऋषभ पंतने दोन्ही डावांमध्ये शतक झळकावत मोठे विक्रम आपल्या नावे केले आहेत. पण भारताने क्षेत्ररक्षण करताना मात्र दोन्ही डावांमध्ये मोठी चूक केली आहे.शुभमन गिलच्या कर्णधारपदाच्या कारकिर्दीची सुरुवात पराभवाने झाली. हेडिंग्ले कसोटीत इंग्लंडने भारताकडून विजय हिसकावून घेतला. टीम इंडियाचे खराब क्षेत्ररक्षण देखील या पराभवाचे कारण ठरले.शुबमन गिल सामन्यानंतर म्हणाला, "मला वाटतं हा एक उत्तम कसोटी सामना होता. आमच्याकडे संधी होत्या, आम्ही झेल सोडले आणि आमच्या खालच्या फळीने पुरेसे योगदान दिले नाही. पण संघाचा अभिमान आहे आणि एकंदरीत संघ म्हणून चांगला प्रयत्न केला. काल आम्ही ४३० धावांच्या आसपास धावसंख्येवर डाव घोषित करण्याचा विचार करत होतो. दुर्दैवाने आम्ही शेवटी २०-२५ धावांमध्ये ६ विकेट्स गमावले, जी खरंच चांगली गोष्ट नव्हती. आजही त्यांच्या सलामीवीरांच्या चांगल्या सुरूवातीनंतर आमच्या हातात सामना होता, पण निकाल आमच्या बाजूने लागला नाही."भारताची खालची फलंदाजी फळी कोसळल्याबद्दल बोलताना गिल म्हणाला, "हो आम्ही याविषयी चर्चा केली. येत्या सामन्यांमध्ये आम्हाला याबाबतीत सुधारणा करावी लागणार आहे. अर्थात, अशा खेळपट्ट्यांवर बाद करण्याच्या संधी सहज मिळत नाहीत. हा एक तरुण संघ आहे जो शिकत आहे आणि आशा आहे की आम्ही यामध्ये सुधारणा करू शकू."पहिल्या सत्रात आम्ही खूप चांगली गोलंदाजी केली, आम्ही जास्त धावा दिल्या नाहीत. चेंडू जुना झाल्यानंतर धावांवर अंकुश ठेवणं कठीण असत आणि सामन्यात टिकून राहण्यासाठी विकेट्स घेणं महत्त्वाचं होतं. दुर्दैवाने काही झेल आम्ही पकडू शकलो नाही. पण माझ्या मते त्यांनी चांगली फलंदाजी केली आणि त्यांच्या सलामी जोडीने भागीदारीने सामना आमच्यापासून हिरावून घेतला.", गिल पुढे म्हणाला.जडेजाच्या गोलंदाजीबद्दल बोलताना गिल म्हणाला, "त्याने उत्तम गोलंदाजी केली. त्याने विकेटच्या काही संधी निर्माण केल्या, काही पॉप-अप झालेले झेल जे ऋषभ पकडू शकला नाही. पण क्रिकेटच्या सामन्यात असं घडत."भारताचा आता दुसरा कसोटी सामना २ जुलैपासून सुरू होणार आह, हा सामना बर्मिंगहममध्ये खेळवला जाईल. आता या सामन्यात बुमराह खेळणार की नाही आणि संघाच्या प्लेईंग इलेव्हनमध्ये कोणते बदल होणार, यावर सर्वांच्या नजरा असतील.भारतीय संघाच्या वरच्या फळीतील फलंदाजांनी दोन्ही डावात उत्कृष्ट फलंदाजी करत संघाला मोठी धावसंख्या उभारून दिली. यशस्वी जैस्वाल, शुबमन गिल, ऋषभ पंत आणि केएल राहुल यांनी या सामन्यात शतकं केली. तर ऋषभ पंतने दोन्ही डावांमध्ये शतक झळकावत मोठे विक्रम आपल्या नावे केले आहेत. पण भारताने क्षेत्ररक्षण करताना मात्र दोन्ही डावांमध्ये मोठी चूक केली आहे.

### दुसरा कसोटी सामना 2 जुलैपासून

शुभमन गिलच्या कर्णधारपदाच्या कारकिर्दीची सुरुवात पराभवाने झाली. हेडिंग्ले कसोटीत इंग्लंडने भारताकडून विजय हिसकावून घेतला. टीम इंडियाचे खराब क्षेत्ररक्षण देखील या पराभवाचे कारण ठरले.शुबमन गिल सामन्यानंतर म्हणाला, "मला वाटतं हा एक उत्तम कसोटी सामना होता. आमच्याकडे संधी होत्या, आम्ही झेल सोडले आणि आमच्या खालच्या फळीने पुरेसे योगदान दिले नाही. पण संघाचा अभिमान आहे आणि एकंदरीत संघ म्हणून चांगला प्रयत्न केला. काल आम्ही ४३० धावांच्या आसपास धावसंख्येवर डाव घोषित करण्याचा विचार करत होतो. दुर्दैवाने आम्ही शेवटी २०-२५ धावांमध्ये ६ विकेट्स गमावले, जी खरंच चांगली गोष्ट नव्हती. आजही त्यांच्या सलामीवीरांच्या चांगल्या सुरूवातीनंतर आमच्या हातात सामना होता, पण निकाल आमच्या बाजूने लागला नाही.

# गोल्डन बॉयने पटकावलं सुवर्णपदक!

## नीरज चोप्राने एका आठवड्यात जिंकलं दुसऱ्या स्पर्धेचं जेतेपद

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारताचा दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता नीरज चोप्राने एका आठवड्यात दुसऱ्या स्पर्धेचं जेतेपद आपल्या नावे केलं आहे. नीरज चोप्रा ओस्ट्रावा गोल्डन स्पाईक २०२५ स्पर्धेचा विजेता ठरलाय. पहिला थ्रो फाऊल ठरल्यानंतर नीरज चोप्राने सर्व थ्रो ८० मीटरच्या पुढे करत स्पर्धा आपल्या नावे केली.**

गोल्डन बॉय नीरज चोप्राने मंगळवार, २४ जून रोजी प्रतिष्ठित जागतिक ॲथलेटिक्स कॉन्टिनेंटल टूर श्रेणी अ स्पर्धेत ऑस्ट्राव्हा गोल्डन स्पाइक स्पर्धेत पदार्पणात सुवर्णपदक जिंकले. नीरजने या सामन्यात ८५.२९ या बेस्ट थ्रो सह पहिलं स्थान पटकावल आहे. नऊ जणांच्या क्षेत्रात नीरजने या एकाच थ्रोसह वर्चस्व गाजवले, ज्यामध्ये त्याचा कट्टर प्रतिस्पर्धी ज्युलियन वेबर नव्हता.दक्षिण आफ्रिकेच्या डाऊ स्मिथने ८४.१२ मीटरच्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीसह आश्चर्यचकित करत रौप्यपदक जिंकले. माजी विश्वविजेत्या अँडरसन पीटर्सला मागे टाकत त्याने ८३.६३ मीटरच्या सर्वोत्तम प्रयत्नासह कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.नीरज या स्पर्धेची सुरूवात फाऊलने केली. पण पुढचे सर्व थ्रो त्याने कमालीचे केले, जे ८० मीटरच्या पलीकडे होते. त्याच्या शेवटच्या प्रयत्नात नीरजने मोठा फिनिश करण्याचा प्रयत्न केला परंतु थ्रो ८५ मीटरपेक्षा कमी पडेल हे लक्षात आल्यानंतर त्याने जाणूनबुजून फाउल लाइन ओलांडली.नीरज स्पर्धा आपल्या नावे केली असली तरी त्याच्या अखेरच्या थ्रोवर तो निराश दिसला. या मजली स्पर्धेच्या 61



व्या आवृत्तीत तो स्वतःविरुद्धच्या स्पर्धेत वैयक्तिक मैलाचा दगड गाठत असल्याचे हे लक्षण होते. २० जून रोजी पॅरिस डायमंड लीगमध्ये विजय मिळवल्यानंतर नीरजने सलग दुसऱ्यांदा अव्वल स्थान पटकावले. ओस्ट्रावा स्पर्धेतील हा विजय पुढील महिन्यात होणाऱ्या नीरज चोप्रा क्लासिक या स्पर्धेपूर्वी त्याचा आत्मविश्वास वाढवणारा असेल. नीरज क्लासिक ही भारताची पहिली मोठी आंतरराष्ट्रीय भालाफेक स्पर्धा असणार आहे. गोल्डन बॉय नीरज चोप्राने मंगळवार, २४ जून रोजी प्रतिष्ठित जागतिक ॲथलेटिक्स कॉन्टिनेंटल टूर श्रेणी अ स्पर्धेत ऑस्ट्राव्हा गोल्डन स्पाइक स्पर्धेत पदार्पणात सुवर्णपदक जिंकले. नीरजने या सामन्यात ८५.२९ या बेस्ट थ्रो सह पहिलं स्थान पटकावल आहे. नऊ जणांच्या क्षेत्रात नीरजने या एकाच थ्रोसह वर्चस्व गाजवले, ज्यामध्ये त्याचा कट्टर प्रतिस्पर्धी ज्युलियन वेबर नव्हता.दक्षिण आफ्रिकेच्या डाऊ स्मिथने ८४.१२ मीटरच्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीसह आश्चर्यचकित करत रौप्यपदक जिंकले.

### कांस्यपदकावर समाधान

माजी विश्वविजेत्या अँडरसन पीटर्सला मागे टाकत त्याने ८३.६३ मीटरच्या सर्वोत्तम प्रयत्नासह कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.नीरज या स्पर्धेची सुरूवात फाऊलने केली.त्याच्या शेवटच्या प्रयत्नात नीरजने मोठा फिनिश करण्याचा प्रयत्न केला परंतु थ्रो ८५ मीटरपेक्षा कमी पडेल हे लक्षात आल्यानंतर त्याने जाणूनबुजून फाउल लाइन ओलांडली



Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Not just education, but
Personality
transformation.
ADMISSIONS OPEN for 2025-26
• CBSE curriculum
• Initiatives like 'Read-to-Lead'
• Tradition of 100% result
Gayatri English Medium School & Junior College, Charholi
95277 64646 / 77967 67292